ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख १८ जून, १९५८ अंक १५

## विविध माहिती

**रशिआंतच बोलणारा उपग्रह**—रशिआनें अंतरिक्षांत सोडलेल्या तिसऱ्या उपग्रहांत बसविलेलीं संदेश देणारीं यंत्रें अशा बेतानें बसविण्यांत आलेलीं आहेत कीं, उपग्रह रशिआवरील आकाशांत असेल तेव्हांच तीं बोलकीं होतील. संदेशांचा अर्थ लावणारीं यंत्रें रशिआंतच उपलब्ध असल्यानें अशी व्यवस्था करण्यांत आली आहे.

**यांत्रिक नांगरांची आयात**—परदेशी चलनाच्या अडचणीमुळें भारत सरकारनें नव्या यंत्रचलित नांगरांची आयात करण्याचें बंद केलें आहे. त्यामुळें राज्य सरकारांकडून येणाऱ्या मागण्या पुरवितां येणार नाहींत. मध्यवर्ती यांत्रिक नांगर संघटनेंतील नांगर आतां जुने झाले असल्यानें निरुपयोगी बनले आहेत.

**मल्याळी वाङ्मयाचा इतिहास**—भारताच्या साहित्य ॲकॅडमीतर्फे देशांतील निरनिराळया भाषांच्या वाङ्मयाचा इतिहास लिहिण्याचें काम चालू आहे. त्यापैकी मल्याळी भाषेंतील वाङ्मयाचा इतिहास नुकताच प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्या इतिहासाचें भाषांतर इंग्रजींत व इतर भारतीय भाषांत करण्याचें कामहि चालू आहे.

**मंगलोर येथें आरोग्यकेंद्र**—जागतिक आरोग्य संघटनेतर्फे मंगलोर येथें नागरी-आरोग्य-केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. संघटनेतर्फे स्थापन करण्यांत येणारें भारतामधील हें पहिलेंच केंद्र असून तें प्रायोगिक स्वरूपाचें आहे. तें यशस्वी झाल्यास त्याच धर्तीवर आणखी कांहीं आरोग्य केंद्रें स्थापन करण्यांत येतील.

**अशुद्ध लोखंडाची निर्यात**—बेल्लारी जिल्ह्यांतील अशुद्ध लोखंडाच्या मातीची निर्यात कडलोर बंदरामार्गे जपानला करण्यांत येणार आहे. ह्या निर्यातीस जुलै महिन्यांत प्रारंभ होईल व एका वर्षाच्या अवधींत सुमारें ७५,००० टन माती निर्यात करण्यांत येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**स्टीव्हन्सन ह्यांची रशिआला भेट**—अमेरिकेच्या डेमोक्रॅटिक पक्षाचे पुढारी श्री. ॲडलाय स्टीव्हन्सन पुढील महिन्यांत रशिआला भेट देणार आहेत. रशिआंतील आपला दौरा रशिअन सरकारच्या खर्चानें करण्याचें त्यांनीं नाकारलें आहे. ते स्वतःचा खर्च स्वतः करणार आहेत. रशिआंतील ज्या प्रदेशाला अद्याप परदेशीय नागरिकांनीं भेट दिलेली नाहीं तेथेंहि जाण्याची परवानगी त्यांना मिळाली आहे.

**सेव्हिंग्ज सर्टिफिकेटसूची देणगी**—दिल्लीजवळील एका खेड्यांत झालेल्या विवाहप्रसंगीं मुलीकडील बाजूनें नवरदेवाला देणगी म्हणून नेहमींप्रमाणें सोनें अगर जवाहिराच्या वस्तू न देतां ५,००० रुपयांचीं नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस् दिलीं. हीं सर्टिफिकेटस् विवाह व जयंतीसारख्या प्रसंगासाठी काढलेलीं असून अत्यंत आकर्षक आहेत.

**सौराष्ट्रांतील गिरण्या**—सौराष्ट्र गिरणी-मालक-संघातर्फे असें जाहीर करण्यांत आलें कीं वाढता कर, वाढते वाहतुकीचे दर आणि वाढती वेतनें, ह्यांच्यामुळें सात कापडाच्या गिरण्या बंद होण्याचा संभव आहे. गेल्या सहा महिन्यांत ह्या गिरण्यांना दरमहा ४०,००० रुपये तोटा येत आहे.

**मजूर संघटनांना कायदेशीर मदत**—औद्योगिक कोर्टापुढें कामगारांचे तंटे नेणाऱ्या संघटनांना कायदाविषयक मदत करण्यासाठी केरळ सरकारनें एक वकील नेमला आहे. कामगारांचे योग्य व कायदेशीर हक्क मिळवून देण्यासाठी ही नेमणूक करण्यांत आली आहे.

**पोलिस अधिकाऱ्याचा विनातिकिटाचा प्रवास**—बिहारमधील एक बडा पोलिस अधिकारी आपल्या कुटुंबांतील तीन माणसांसह विनातिकिट प्रवास करतांना आढळून आला. रेल्वे नोकरांनीं त्याच्याकडून भाडें व दंड मिळून १७० रुपये वसूल केले. पोलिस अधिकारी पहिल्या वर्गानें प्रवास करीत होता.

**चंबळ धरणावर उत्पन्न होणारी वीज**—भारतांत ठिकठिकाणीं होणाऱ्या नव्या धरणावरील वीज कशी वापरतां येईल ह्यासंबंधीं तपासणी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एक कमिटी नेमली आहे. ह्या कमिटीनें दिलेल्या इशाऱ्यास अनुसरून १९५९ सालापासून चंबळ नदीवरील धरणावर उत्पन्न होणाऱ्या विजेच्या वापराची एक योजना मध्यप्रदेश सरकार तयार करणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## भारतांतील साखरेचा धंदा

कित्येक वर्षे भारतांत साखर उत्पादनाचा धंदा चालू आहे. तथापि १९३२ नंतर या व्यवसायाची प्रगति अत्यंत जलद झाली. भारतांतील मोठ्या धंद्यांपैकी दुसऱ्या नंबरचा धंदा म्हणून या धंद्याला आज स्थान प्राप्त झालें आहे. १९५५ मधील या धंद्याचें स्वरूप खालीलप्रमाणें होतें :—

| राज्य | कारखाने | कामगारांची संख्या | उत्पादन (कोटि रु.) |
|---|---|---|---|
| मुंबई | १४ | ८,७८५ | १३·६४ |
| मद्रास | ४ | ३,९०९ | ४·८६ |
| आ.प्र | ८ | ४,२४४ | ४·८२ |
| उत्तर प्रदेश | ९३ | ६८,८८२ | ६४·४५ |
| बिहार | २१ | २८,६११ | २३·५१ |
| राजस्थान | ३ | १,५२६ | १·०१ |

## रत्नागिरी अर्बन को. बँकेंत श्री. बाळासाहेब चितळे यांच्या तैल-चित्राचें अनावरण

रत्नागिरीचे सुप्रसिद्ध वकील श्री. गजानन बाळकृष्ण ऊर्फ बाळासाहेब चितळे हे सुमारें एक वर्षापूर्वी रत्नागिरी सोडून (शीव) मुंबई येथें राहावयास गेले. श्री. चितळे हे १९२६ सालापासून रत्नागिरी सोडीपर्यंत सतत ३२ वर्षे रत्नागिरी अर्बन कोऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन होते. शिवाय कै. श्री. परुळेकर यांचेनंतर १९४२ सालापासून सतत १५ वर्षें ते या बँकेचे अध्यक्ष व चेअरमन या दोन्ही नात्यानें त्यांनीं रत्नागिरी अर्बन को. बँकेची सेवा केली व बँकेला विशिष्ट दर्जा प्राप्त करून दिला त्यांनीं बँकेच्या उत्कर्षासाठी आपल्या कारकीर्दीत फार परिश्रम घेतले. त्यांची स्मृति चिरंतन रहावी म्हणून रत्नागिरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या हल्लींच्या डायरेक्टर बोर्डानें त्यांचें तैल-चित्र रत्नागिरी अर्बन बँकेचें सध्यांचे ऑफिसांत लावण्याचें ठरविलें. सदर तैलचित्राचा अनावरण समारंभ गुरुवार दिनांक २९ मे रोजीं सायंकाळीं ६ वाजतां अर्बन बँकेचे माडीवर सहकारी खात्याचे जॉईंट रजिस्ट्रार श्री. सी. के. पटेल यांचे हस्तें झाला.

## सिनेमाचें आकर्षण गोष्टींत, का नट-नटींत ?

सिनेमाला जाणारे लोक मुख्यतः त्यांतील गोष्टींसाठी जातात, असें अमेरिकेंतील ओपिनिअन रिसर्च कॉर्पोरेशनला पहाणींत आढळून आलें आहे. प्रेक्षकांपैकी ४५% लोकांना चित्रपटाची गोष्ट सर्वांत महत्त्वाची वाटली, १८% लोकांना नट व नट्या ह्यांचें आकर्षण वाटलें. २७% लोकांना दोन्ही बाबींचें महत्त्व वाटलें. सिनेमाला जाणारांपैकी ७५% लोक ३० वर्षांखालील होते; ५२% तर २० वर्षांच्या खालील होते. मोठ्या शहरांतून सिनेमाचें वेड अधिक आढळलें.


**हातमागाच्या कापडाची निर्यात**—हातमागाच्या कापडाच्या निर्यातीची व्यवस्था पहाण्यासाठी भारत सरकार एक स्वतंत्र कॉर्पोरेशन स्थापन करणार आहे, अशी माहिती उद्योग व व्यापारमंत्री श्री. लालबहादुर शास्त्री ह्यांनीं सांगितली. निर्यात वाढवून परदेशीय चलन मिळण्याच्या सरकारच्या प्रयत्नाचा हा एक भाग आहे.


बचतीतून राष्ट्रसेवा
बचत करा— समृद्ध व्हा.
तुमच्या समृद्धीवर राष्ट्राची समृद्धी अवलंबून आहे.
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक गृह, गिरगांव, मुंबई ४.
शाखा: फोर्ट, दादर, माहिम, घरकी, पुणे, बेळगांव.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चात मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४

कण आणि क्षण
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)
लेखक :–श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठी एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. १८ जून, १९५८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मध्यप्रदेशांतील सहकारी चळवळ

मध्यप्रदेश सरकारच्या सहकार मंत्र्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत राज्यांतील एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या सहकारी संस्थांच्या कक्षेत आणण्याचा सरकारचा विचार आहे. ह्यासाठी जरूर ती योजना आखण्याचें काम लवकरच चालू करण्यांत येईल. सध्यां राज्यांतील १२ टक्के लोकसंख्याच सहकारी संस्थांमार्फत करण्यांत येणाऱ्या आर्थिक व्यवहारांचा फायदा घेत आहे. राज्यांत आज २०,००० सहकारी संस्था असून त्यांपैकी १७,००० पतीवर व्यवहार करणाऱ्या व बाकीच्या इतर आहेत. राज्य सरकारनें सहकारी संस्थांचा व्याप वाढविण्याच्या दृष्टीनें सहकारी संस्थांचे अध्यक्ष व कार्यकर्ते ह्यांना शिक्षण देण्याचें ठरविलें आहे. शिक्षण देणारीं हीं केंद्रें जिल्हानिहाय उघडण्यांत येणार आहेत. सहकारी संस्था चालविण्यासाठी जीं विविध प्रकारचीं कामें करावीं लागतात त्याविषयीं खास शिक्षण देण्याची व्यवस्था केंद्रांतून करण्यांत येणार आहे. शक्य तर सहकारी चळवळीला अखिल जनतेच्या पाठबळाची व्यापक भूमिका मिळावी ह्यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे. पतीवर व्यवहार करणाऱ्या सहकारी संस्था आणि मार्केटिंग करणाऱ्या सहकारी संस्था ह्यामधून सरकारी भागीदारी निर्माण करण्याचें तत्त्व स्वीकारण्यांत आलेलें आहे. शेतीच्या सहकारी संस्थांची पुन्हां स्थापना करण्याचें आणि स्वतंत्रपणें काम करूं न शकणाऱ्या लहान संस्थांचें एकत्रीकरण करण्याचें सरकारचें धोरण राहील.

## प्लॅस्टिकच्या उद्योगधंद्याची प्रगति

प्लॅस्टिकच्या वस्तू बनविणाऱ्या कारखानदारांची ११ वी परिषद मुंबई येथें भरली होती. कारखानदार संघाचे अध्यक्ष श्री. बी. एम. ठक्कर ह्यांनीं ह्या प्रसंगीं प्लॅस्टिकच्या उद्योगधंद्याच्या प्रगतीविषयीं पत्रकारांना माहिती दिली. ते म्हणाले कीं भारतामधील प्लॅस्टिकचे कारखाने देशाच्या सर्व गरजा पूर्णपणें भागवूं लागले आहेत, इतकेंच नव्हे तर उत्पादनापैकी बराच भाग परदेशी निर्यात करून टंचाई असलेलें परदेशीय चलनहि मिळवूं लागले आहेत. १९५७–५८ सालीं भारतानें सुमारें २० लाख रुपये किंमतीच्या प्लॅस्टिकच्या वस्तू परदेशी निर्यात केल्या. त्यापूर्वीच्या वर्षांत अवघ्या ७.४ लाख रुपये किंमतीच्या वस्तू निर्यात करण्यांत आल्या होत्या. ह्या धंद्याला लागणाऱ्या कच्च्या मालाच्या बाबतींत भारत हळुहळु स्वयंपूर्ण होऊं लागला आहे. ह्या बाबतींत १९४६ सालीं प्रयत्नांना सुरवात झाली आणि १९५७ सालीं त्यांपैकी कांहीं प्रयत्न यशस्वी झाले. १९६१ च्या सुमारास भारत कच्च्या मालाच्या पुरवठ्याच्या बाबतींत जवळ जवळ स्वयंपूर्ण होईल अशी आशा वाटत आहे. परिषदेंत झालेल्या इतर भाषणांवरून असें दिसून आलें कीं ह्या धंद्याच्या प्रगतीला चांगला वाव आहे. प्लॅस्टिकच्या धंद्याबाबत जपाननें लक्षांत भरण्यासारखी प्रगति केलेली आहे. भारतांत तयार करण्यांत येणारें 'लेदर क्लॉथ' चांगल्या दर्जाचें ठरलें आहे. भारतांत तयार होणाऱ्या चष्म्याच्या फ्रेम्स्, ब्रिटन, अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिआ ह्या देशांना निर्यात करण्यांत येत आहेत. त्याचप्रमाणें छत्र्यांच्या मुठीहि निर्यात होत आहेत.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनसाठी परदेशी कर्ज ?

भारताचें इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन परदेशांत कर्ज काढण्याचा विचार करीत आहे, असें समजतें. देशांतील उद्योगधंद्यांच्या विकासाला मदत करण्यासाठी कॉर्पोरेशनची स्थापना १९४८ सालीं करण्यांत आली. पण भारताला सध्यां परदेशीय चलनाची जी टंचाई पडली आहे तिची बाधा कॉर्पोरेशनलाहि झाली आहे. म्हणून परदेशांत कर्ज काढून ही टंचाई भरून काढण्याचा प्रयत्न कॉर्पोरेशन करणार आहे. कॉर्पोरेशनचें वसूल भांडवल ५ कोटी रुपयांचें आहे. गेल्या दहा वर्षांत कॉर्पोरेशननें हिंदी उद्योगधंद्यांच्या विकासासाठी ५८ कोटी रुपयांचीं कर्जें मंजूर केलीं आहेत. त्याशिवाय १८.४ कोटी रुपयांचीं कर्जें मिळण्याबद्दलचे अर्ज कॉर्पोरेशनपुढें विचारासाठी आहेत. त्या अर्जांचा निकाल अद्याप लागलेला नाहीं. देशांतील भांडवलाच्या बाजारांतून १३ कोटी रुपयांचें कर्ज कॉर्पोरेशननें उभारलेलें आहे. हें कर्ज काढण्यासाठी बाँडस काढण्यांत आले. त्याशिवाय भारत सरकारकडूनहि कॉर्पोरेशननें कर्ज काढलें आहे. दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम पुरा होईपर्यंत सरकारकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम २२ कोटी रुपयांपर्यंत जाईल असा अंदाज आहे. कॉर्पोरेशनकडे येणाऱ्या कर्जाच्या मागण्या पुरविण्यासाठी येत्या दोन वर्षांत बऱ्याच पैशाची गरज लागणार आहे. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांच्या विकासासाठी लागणारा पैसा कॉर्पोरेशनला मुख्यतः पुरवावा लागणार आहे. कॉर्पोरेशन आयुर्विमा कॉर्पोरेशनकडे मोठें कर्ज मागण्याचा संभव आहे.

**औद्योगिक शांततेचा करार**—त्रावणकोर सिमेंटस लि. ह्या कंपनीच्या चालकांत व कारखान्यांतील मजुरांत चार वर्षें औद्योगिक शांतता पाळण्याचा करार करण्यांत आला आहे. करारावर सह्या होण्याच्या प्रसंगीं राज्याचे मजूरमंत्री मि. थॉमस जातीनें हजर होते.

**साखर कामगारांना बोनस**—प्रवरानगर सहकारी साखर कारखान्यानें आपल्या हंगामी मजुरांना ३५,००० रुपये बोनस म्हणून वाटले आहेत. बोनसचा फायदा २,३०० मजुरांना मिळाला. सहकारी साखर कारखान्यानें आपल्या हंगामी कामगारांना बोनस वाटल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

**केरळमधील कुटुंबनियोजन**—केरळ राज्यांत कुटुंबनियोजन लोकप्रिय करण्यासाठी सरकारनें सर्व जनरल इस्पितळांना व जिल्हा इस्पितळांना, ह्यासंबंधीची शस्त्रक्रिया मोफत करण्यांत यावी असा हुकूम दिला आहे. केरळ राज्यांत लोकवस्ती फार दाट आहे.

# BANK OF

## BALANCE SHEET AS

| 1956 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| 50,00,000 | *Authorised Capital* : 50,000 Shares of Rs. 100/- each ... | 50,00,000—00 | |
| 25,00,000 | *Issued Capital* : 25,000 Shares of Rs. 100/- each ... | 25,00,000—00 | |
| 25,00,000 | *Subscribed Capital* : 25,000 Shares of Rs. 100/- each ... | 25,00,000—00 | |
| 12,50,000 | Amount called up at Rs. 50/- per share. ... | 12,50,000—00 | |
| | Less Call unpaid. ... | Nil | |
| | Add Forfeited Shares. ... | Nil | 12,50,000—00 |
| 34,500 | **2. Reserve Fund and Other Reserves** ... | | 34,500—00 |
| | **3. Deposits and Other Accounts :** | | |
| 3,95,379 | Fixed Deposits ... | 4,17,638—11 | |
| 6,52,251 | Savings Bank Deposits ... | 6,79,870—70 | |
| 5,14,613 | Current Accounts, and Contingency Accounts, etc. ... | 4,65,372—82 | 15,62,881—63 |
| 15,62,243 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| 1,24,616 | (i) In India ... | Nil | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | Nil |
| | **Particulars** | | |
| | (i) Secured ... | Nil | |
| Nil | (ii) Unsecured ... | Nil | Nil |
| 3,425 | **5. Bills Payable** ... | | Nil |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable as per contra :** | | |
| 98,737 | (i) Payable in India ... | 84,552—74 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 84,552—74 |
| | **7. Other Liabilities** | | |
| 1,806 | (1) Provision for Income tax ... | 1,806—19 | |
| | Less adjusted towords Income tax. ... | 54—31 | |
| | | 1,751—88 | |
| | Less adjusted towords Provision for Doubtful Debts. ... | 1,751—88 | |
| 4,406 | (2) Branch Adjustment ... | Nil | |
| 510 | (3) Outstanding Liabilities for Expenses. ... | 108—50 | |
| 263 | (4) Income received in advance. ... | 253—33 | |
| — | (5) Staff Security Deposits. ... | 1,000—00 | 1,361—83 |
| 6,985 | | | |
| 30,80,506 | Carried over Rs. ... | | 29,33,296—20 |

# POONA LIMITED.

**AT 31st DECEMBER, 1957**

| 1956 | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Cash** | | |
| 3,54,176 | In hand and with Reserve Bank and State Bank (Including Foreign Currency Notes) ... | | 2,80,769—99 |
| | **2. Balances with Other Banks** | | |
| | (On current account) | | |
| 1,53,476 | (1) In India ... | 1,59,483—87 | |
| Nil | (2) Outside India ... | Nil | 1,59,483—87 |
| Nil | **3. Money at Call and Short Notice** ... | | Nil |
| | **4. Investments** | | |
| | (At Book Value) | | |
| | (1) Securities of the Central and State Governments and other trustee securities including Treasury Bills of the Central and State Governments of the face value of Rs. 6,01,300/- (Market value Rs. 5,61,285-45) ... | 5,99,202—25 | |
| | (2) Shares: Ordinary fully paid (Market value Rs. 3,263—78) ... | 6,069—53 | |
| | Partly paid ... | Nil | |
| | Deferred fully paid ... | Nil | |
| | (3) Debentures or Bonds ... | Nil | |
| | (4) Other Investments ... | Nil | |
| | (5) Gold ... | Nil | 6,05,271—78 |
| 6,05,272 | (Govt. Securities of the face value of Rs. 6,00,000/- are lodged with other Banks for advance facilities). | | |
| | **5. Advances** (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors subject to particulars under clause (4) below): | | |
| | (1) Loans, Cash-Credits, Over-drafts etc. | | |
| 17,12,456 | (1) In India ... | 16,08,305—81 | |
| Nil | (2) Outside India ... | Nil | |
| | (2) Bills Discounted and Purchased (excluding treasury bills of the Central and State Governments) | | |
| 2,435 | (1) Payable in India ... | 5,357—24 | |
| Nil | (2) Payable outside India ... | Nil | 16,13,663—05 |
| | **Particulars of Advances** | | |
| 10,73,216 | (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | 10,37,616—11 | |
| 3,25,505 | (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security. ... | 2,35,661—05 | |
| Nil | (3) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtors ... | Nil | |
| 3,16,170 | (4) Debts considered doubtful or bad, not provided for. | 3,40,385—89 | |
| 17,14,891 | | 16,13,663—05 | |
| 42,535 | (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | 45,040—09 | |
| 18,894 | (6) Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies, as members. ... | Nil | |
| 42,535 | (7) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | 46,688—57 | |
| | Carried over ... | | 26,59,188—69 |

# BANK OF

## BALANCE SHEET AS

| 1956 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 30,80,506 | Brought forward ... | | 29,33,296—20 |
| Nil | 8. Acceptances, Endorsements and other Obligations as per contra : ... | | Nil |
| Nil | 9 Contingent Liabilities | | Nil |
| 30,80,506 | TOTAL Rs. ... | | 2933,296—20 |

## Dr. PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31st DECEMBER 1957 Cr.

| 1956 | EXPENDITURE | Rs. nP. | 1956 | INCOME (Less provision made during the year for bad and doubtful debts and other usual or necessary provisons) | Rs. nP. |
|---|---|---|---|---|---|
| 33,511 | To Interest paid on Deposits, Borrowings, etc. ... | 32,244—44 | 72,578 | By Interest and Discount ... | 53,267—06 |
| | " Salaries and Allowances and Provident Fund : | | 4,587 | " Commission, Exchange, & Brokerage. ... | 3,835—47 |
| 6950 | (1) Manager ... 6,980-00 | | Nil | " Rents ... | Nil |
| 36,329<br>43,279 | (2) Staff ... 31837-09 | 38,817—09 | | | |
| Nil | " Directors' and Local Committee Members' Fees and allowances ... | Nil | Nil | " Net Profit on sale of investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or any particular fund or account)... | Nil |
| 8,515 | " Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | 5,979—21 | | | |
| 2,005 | " Law Charges ... | 1,799—17 | | | |
| 3,197 | " Postage, Telegrams, and stamps. ... | 2,919—26 | Nil | " Net profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or any particular fund or account) ... | Nil |
| 1,000 | " Auditors' Fees. ... | 1,000—00 | | | |
| 2,283 | " Depreciation on and repairs to the Banking Company's Property.... | 2,032—00 | 505 | " Income from non-Banking assets and profit from sale or dealing with such assets ... | 300—00 |
| | | | 3,134 | " Other receipts ... | 2,762—88 |
| 5,462 | " Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 3,512—84 | 22,425 | " Net loss for the year. ... | 33,513—52 |
| Nil | " Loss from sale of or dealing with Non-Banking Assets ... | Nil | | | |
| 3,977 | " Other Expenditure. ... | 5,374—92 | | | |
| 1,03,229 | Total ... | 93,678—93 | 1,03,229 | Total Rs. ... | 93,678—93 |

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the foregoing Balance Sheet of the Bank of Poona Limited as at 31st December, 1957 and also the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date, in which are incorporated the audited returns of all Branches of the Bank.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with provision to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of section 211 and section 227(5) of the Companies Act, 1956 the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with sixth Schedule of the Companies Act, 1956. The accounts are, therefore, drawn up in conformity with Forms A & B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that :—

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory; (b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank; (c) In our opinion, proper books of Account as required by law have been kept by the Bank so far as appears from

# POONA LIMITED

**AT 31st DECEMBER, 1957**

| 1956 | PROPERTY & ASSETS | | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | | 26,59,188—69 |
| 58,568 | (8) Maximum total amount of Advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | | 60,305—63 | |
| Nil | (9) Due from Banking Companies ... | | Nil | |
| | **6. Bills Receivable, being Bill for Collection** as per contra. | | | |
| 98,737 | (1) Payable in India ... | | 84,552—74 | |
| Nil | (2) Payable outside India ... | | Nil | 84,552—74 |
| Nil | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations as per Contra :** ... | | | Nil |
| Nil | **8. Premises Less Depreciation** ... | | | Nil |
| | **9. Furniture and Fixtures, Less Depreciation** | | | |
| | At Cost as per last Balance Sheet ... | | 50,798—42 | |
| | Additions during the year. ... | | Nil | |
| | | | 50,798—42 | |
| | Less Depreciation upto 31-12-1956 | 20,214—42 | | |
| 30,584 | For the year | 1,835—00 | 22,049—42 | 28,749—00 |
| | **10. Other Assets including Silver** | | | |
| Nil | (1) Staff security Deposit in Fixed Deposit of Bank of Baroda Ltd. ... | | 1,000—00 | |
| 19,000 | (2) Land and cost ... | | 19,000—00 | |
| | (3) Vehicle ( depreciated cost ) | 407 | | |
| 407 | Less depreciation for the year ending 31-12-57. | 82 | 325—00 | |
| 1,388 | (4) Stationery Stock ... | | 1,295—00 | |
| 110 | (5) Stamps. ... | | 113—44 | |
| 5,675 | (6) Interest accured on Investments ... | | 5,691—81 | |
| 12,630 | (7) Tax deducted at source ... | | 16,980—04 | |
| 222 | (8) Prepaid Expenses ... | | 505—75 | |
| 159 | (6) Income due but not received ... | | 332—19 | |
| 7,105 | (10) Advances for expenses to Pleaders ... | | 9,764—62 | |
| Nil | (11) Branch Adjustments ... | | 1,878—28 | 56,886—13 |
| 37,988 | **11. Non-Banking Assets Aquired in Satisfaction of Claims** | | | 31,720—25 |
| | **12. Profit and Loss Account** | | | |
| | Balance of Loss of Last year. ... | | 38,685—87 | |
| 38,686 | Add Balance of loss this year. ... | | 33,513—52 | 72,199—39 |
| 30,80,506 | Total Rs. ... | | | 29,33,296—20 |

D. R Naik *Chairman.*
N. B. Parulekar }
F. P. Pocha } *Directors.*
G. K. Naik }

G. G. Sathe
*Manager.*

our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches of the Bank; (d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns. (e) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for banking companies, and on such basis the said Balance Sheet read along with the notes appearing there on, gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1957 and the Profit and Loss Account gives a true and fair view of the loss for year ended upon that date.

Poona City,
9th April, 1958

P. G. Bhagwat
Chartered Accountants

**बेळगांव जिल्ह्यांत तांदुळाची विक्री**—बेळगांव जिल्ह्यांत पुढील महिन्यापासून सहकारी संस्थांतर्फे शेराला ८ आणे ह्या दरानें तांदुळाच्या विक्रीस सुरवात करण्यांत येणार आहे. सरकारनें १,००,००० मण तांदूळ गोळा करण्याचें ठरविलें होते. प्रत्यक्ष मात्र ४८,४६५ मण तांदूळ मिळाला. पण तो शेतकऱ्यांनीं स्वखुषीनें दिलेला आहे.

**पत्रकारांचें वेतन**—श्रमिक पत्रकारांच्या वेतनाबाबत सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानें जी अगतिकता निर्माण झाली आहे ती दूर करण्यासाठी भारत सरकार नवा कायदा करणार आहे. पत्रकार-वेतन-मंडळानें धंद्याची वेतन देण्याची कुवत लक्षांत घेतली नाहीं, असें कोर्टाचें मत आहे.

**बहुविध तांत्रिक शिक्षणाच्या संस्था**—मद्रास राज्यांत बहुविध तांत्रिक शिक्षणाच्या चार संस्था चालू शैक्षणिक वर्षांत काढण्यांत येणार आहेत. त्या सालेम, तंजावर, तिरुनेलवेली आणि विरुधनगर ह्या ठिकाणीं काढण्याबद्दल भारत सरकारनें मंजुरी दिली आहे.

**परदेशीय भांडवलाला आमंत्रण**—नेपाळच्या सरकारनें परदेशीय भांडवल आकर्षण करून घेण्यासाठी नवें धोरण जाहीर केलें आहे. नेपाळच्या औद्योगीकरणांत भाग घेणाऱ्या भांडवलाला परत स्वदेशीं नेण्याची व त्यावरील नफा भारताबाहेर पाठविण्याची हमी नव्या धोरणाप्रमाणें देण्यांत आली आहे.


# दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

( स्थापना : डिसेंबर १९११ ) ★ मुख्य कचेरी : मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. | ६,३००,०,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... | रु. | ३,१४,५४,२५० |
| राखीव व इतर निधी | ... ... | रु. | ४,०३,६०,८२० |
| ठेवी ( ३१-१२-१९५७ ) | ... ... | रु. | १,५५,१४,५०,६६४ |

—संचालक मंडळ—

सर होमी मोदी, के. बी. ई., चेअरमन
श्री. कुंवरजी होरमसजी भाभा, व्हाईस चेअरमन
श्री. दिनशॉ डी. रोमर
श्री. धरमसी मुळराज खटाव
श्री. मनमोहनदास माधवदास अमरसी
श्री. सी. पी. वाडिया
श्री. चिमणलाल बापालाल पारेख
श्री. फ्रामरोझ जे. गझदर
सर जमशेटजी जिजीभॉय, बॅरोनेट
हिज हायनेस सर जिवाजीराव माधवराव सिंधीया, जी. सी. एस. आय., जी. सी. आय. ई. महाराजा ऑफ ग्वाल्हेर

भारत, पाकिस्तान व ब्रह्मदेश या देशांत, सर्व प्रमुख शहरीं आणि इतर ठिकाणीं बँकेच्या २०० चे वर शाखा आहेत.
लंडन शाखा : १५९ फेन् चर्च स्ट्रीट, लंडन, ई. सी. ३. जगांतील प्रमुख राष्ट्रांतील बँकांशीं एजन्सी व्यवस्था.

**आमच्या टिळक रोड शाखेंत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय करण्यांत आली आहे.**

पुण्यांतील शाखा :
( १ ) लक्ष्मी रोड ( २ ) ईस्ट स्ट्रीट ( ३ ) टिळक रोड

व्ही. आर. सोनाळकर, चीफ एजंट, पूना ग्रुप. * * * एन् के. करंजीया, जनरल मॅनेजर



## Deccan Institute of Commerce

*717, Budhwar Peth, Poona-2.*

( Govt. Recognised )


Opens for the 1958-59 Session on Monday the 23rd June 1958. Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., G. D. C. & A., C. A. I. I. B., A. C. W. A., Shorthand, Typewriting and Poona University's External Pre-Degree Course - Commerce. Morning and Evening Classes.

Admission to respective Courses open to S. S. C., Under-Graduates and Graduates.

Prospectus free on application to the Principal.



## अन्नाचें रहस्य



बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.